महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक - ४२२००३.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &HIGHER SECONDARY EDUCATION,
NASHIK DIVISIONAL BOARD ,NASHIK – 422 003

पुण्यश्लोक 300

गट/सर्वे नं.१५६०/१ आडगांव शिवार, न्यू इंग्लिश स्कूलजवळ, मुंबई आग्रा रोड, आडगांव, नाशिक
Website : www.sscboardnashik.com Telephone : ०२५३ २९४५२४१, २९४५२५१ Email :

अत्यंत महत्त्वाचे

क्र. नाविमं/लेखा/गुणपत्रक शुल्क/608
नाशिक — ४२२ ००३
दिनांक :— ०७/०५/२०२६ 08

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मंडळ मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
नाशिक, धुळे, जळगाव व नंदुरबार जिल्हा

विषय :— इ. १० वी व इ. १२ वी गुणपत्रक / प्रमाणपत्र शुल्काबाबत...
संदर्भ :— राज्य मंडळ कार्यालयाचे क्र. रा.मं./लेखा—६/१९०८, दिनांक ०५/०५/२०२६ चे पत्र.

उपरोक्त विषयांस अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२६ च्या परीक्षेपासून विद्यार्थ्यांना गुणपत्रक व प्रमाणपत्र एकत्रित छपाई करुन देणेबाबतचा विषय दि.०४/०५/२०२६ रोजी झालेल्या कार्यकारी परिषदेमध्ये ठराव क्र.३० अन्वये पारीत झालेला आहे.

तथापि इ.१०वी व इ.१२वी फेब्रुवारी/मार्च २०२६ परीक्षेसाठी शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांकडून प्रती विद्यार्थी स्वतंत्र गुणपत्रक रु.२०/— व प्रमाणपत्र रु.२०/— असे शुल्क आकारण्यात आलेले आहे. परंतू मंडळाकडून फेब्रुवारी/मार्च २०२६ परीक्षेचे एकत्रित गुणपत्रक व प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे.

सबब फेब्रुवारी/मार्च २०२६ च्या परीक्षेपासून व त्या पुढील परीक्षांकरीता विद्यार्थ्यांना देण्यात येणारे गुणपत्रक व प्रमाणपत्रावर क्युआर कोड, विद्यार्थ्यांचा फोटो तसेच साईज ए—४ इ. असणार आहे. त्यामुळे जून/जुलै २०२६ च्या परीक्षेपासून गुणपत्रक रु.२०/— व प्रमाणपत्र रु.२०/— असे स्वतंत्र शुल्क न दाखवता एकत्रितरित्या गुणपत्रक व प्रमाणपत्र शुल्क रु.४०/— आकारण्यात येणार आहे. याची सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक यांनी नोंद घेवून सदर बाब शिक्षक, विद्यार्थी/पालकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

( सरोज जगताप )
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक— ४२२ ००३

प्रत माहितीस्तव :—

१. मा. सचिव, राज्यमंडळ, पुणे— ४११ ००४.
२. शाखाप्रमुख / शाखाधिकारी, उच्च माध्यमिक अ—१
३. शाखाप्रमुख / शाखाधिकारी, माध्यमिक ब—१